# अजित पवार यांच्या सिंचन घोटाळ्याचं 'भूत' पुन्हा मानगुटीवर, भाजपकडून जोरदार हल्ला

**पुणे । दिव्य न्युज ।**

**सत्तेत मांडीला मांडी लावून बसलेले भाजप आणि राष्ट्रवादी पुढच्या काही दिवसांसाठी एकमेकांचे विरोधक असणार आहेत. कारण पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोघे एकमेकांच्याविरोधात लढताहेत. त्यामुळे त्यांना एकमेकांवर टीका करावीच लागणार आहे. भाजपनं अजित पवारांच्या गुंडांच्या टोळ्यांना दिलेली तिकिटं काढली तर अजित पवारांनी सिंचन घोटाळ्याचे आरोप काढून भाजपवर बोचरा वार केलाय.**



- राज्याच्या राजकारणात गाजलेला सिंचन घोटाळा पुन्हा चर्चेत आलाय
- ज्यांच्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले होते त्या अजित पवारांनी याच मुद्यावरुन भाजपला डिवचलं

राज्याच्या राजकारणात गाजलेला सिंचन घोटाळा पुन्हा चर्चेत आलाय. ज्यांच्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले होते त्या अजित पवारांनी याच मुद्यावरून भाजपला डिवचलं. त्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अजित पवारांना, 'अडचण होईल' असा इशारा इशारा दिलाय. भाजपच्या नेत्यांनी २०१४च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांना जेलमध्ये टाकू असं वक्तव्य जाहीर सभांमध्ये केलं होतं. इतकंच नव्हे तर सिंचन घोटाळ्यांची बैलगाडीभर कागदपत्रे भाजपनं चितळे समितीचे माधवराव चितळे यांच्याकडे सादर केली होते. पुराव्यांच्या ४ बॅगा बैलगाडीतून नेण्यात आल्या होत्या. मात्र ज्यांनी बैलगाडीभर पुरावे दिले त्याच भाजप नेत्यांसोबत अजित पवार आता सत्तेत आहेत. मागील तीन वर्षांपासून अजित पवार सत्तेत आहेत.

सर्वात आधी २ जुलै २०२३ रोजी अजित पवार एकनाथ शिंदेंच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. त्याच सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री होते. तर ५ डिसेंबर २०२४ रोजी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्येही अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. मात्र आता महापालिकेच्या निवडणुकीत अजित पवारांनी भाजपवर थेट हल्लाबोल केलाय. ज्यांनी माझ्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्या सगळ्यांसोबत मी आज सरकारमध्ये बसलोय. एवढ्यावरच अजित पवार थांबले नाही तर, भाजपची राक्षसी भूक शहरातली परिस्थिती बिघडवत असल्याची जळजळीत टीका त्यांनी केली. कुत्र्यांच्या नसबंदीत पैसे खाल्ले. मिळेत तिथे पैसे खायचा सपाटा लावला. सत्तेचा माज आल्यामुळे अशी कामं करतात, असा घणाघात अजित पवारांनी केला.

सिंचन घोटाळा नेमका काय होता?

१९९९ ते २००९ या काळात बंधारे आणि सिंचन प्रकल्पांच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याचा आरोप झाला होता. सिंचनावर ७०,००० कोटी रुपये खर्च झाले, पण सिंचन क्षेत्रात केवळ ०.१ टक्क्यांची सुधारणा झाली असं निरीक्षण सरकारच्याच इकोनॉमिक सर्व्हे मध्ये नोंदवलं होतं. अनेक प्रकल्पांसाठी नियोजित केलेल्या किमतींमध्ये अनेक पटींनी वाढ झाल्याचं उ-ऋनं म्हटलं होतं. ६०१ प्रकल्पांपैकी ३६३ प्रकल्पांची नियोजित रक्कम वाढून ४७,४२७ कोटी रुपयांवर गेल्याचं उ-ऋनं म्हटलं होतं. १२ प्रकल्पांची सात महिन्यात दुपटीने वाढली होती. माजी मुख्य अभियंता विजय पांढरे यांच्या गौप्यस्फोटानं अजित पवार अडचणीत आले होते.

मात्र सिंचन घोटाळ्याच्या काही प्रकरणात अजित पवारांनी क्लीनचिटही मिळाली होती. आता सरकारमध्ये असलेल्या अजित पवारांनी त्यांच्यावर झालेल्या आरोपांचा समाचार घेत भाजपवर भ्रष्टाचाराचा आरोप केला. त्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद चव्हाण यांनी जोरदार पलटवार केला. आम्ही आरोप केले तर अजितदादांची अडचण होईल, असे चव्हाण म्हणाले. रवींद्र चव्हाण यांनी अजित पवारांवर तोफ डागल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरींनीही फिल्मी स्टाईलनं डायलॉगबाजी करत उत्तर दिलं. डायलॉगबाजी करू नका, व्यवस्थित बोला, असे मिटकरी म्हणाले.

भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून महायुतीतील घटक पक्षच आपसात लढायला लागले. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनीही रणांगणात उडी घेतली. सिंचन घोटाळ्याचं काय झालं? पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या बाबत माहिती द्यावी, असं आव्हानच संजय राऊतांनी दिलं.

विरोधकांच्या हाती आयता मुद्दा दिल्यामुळे सिंचन घोटाळ्याचा उल्लेख करून अजित पवारांनी ऐन प्रचारात सेल्फ गोल तर केला नाही ना, अशीही चर्चा आता सुरू झालीय. मात्र अजित पवारांनी एक प्रकारे त्यांचं मूल्यही दाखवून दिलंय. कारण अजित पवारांवर आरोप करणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या सरकारमध्येही अजित पवार होते. अजित पवार निधी देत नाहीत, शिवसेना संपवायला निघालेत असा आरोप करणाऱ्या एकनाथ शिंदेंच्या सरकारमध्येही अजित पवार उपमुख्यमंत्री होते. आणि सिंचन घोटाळ्याचा आरोप करणाऱ्या भाजपच्या सरकारमध्येही अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत. तर दुसरीकडे रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे अजित पवारांची कोणती राजकीय अडचण होईल? याकडे राज्याचं लक्ष लागलंय.

## दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



पाटोदा / दिव्य न्युज : पाटोदा येथे जि.प. कन्या शाळा मध्ये माई सावित्रीबाई फुले यांची जयंती गेल्या ३५ वर्षापासून दलित मित्र एकबाल पेंटर हे स्वतः स्वखर्चाने दरवर्षी करत असतात. त्याच पद्धतीने यावर्षी अनेक शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण वकृत्व स्पर्धा व समाजामध्ये काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार प्रा. मोहन परजणे सर यांना देण्यात आला. दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशन च्या वतीने अनेक उपक्रम प्रत्येक वर्षी घेतले जातात. यामध्येच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने मुला- मुलींचे भाषण स्पर्धेमध्ये अनेक मुलींना स्पर्धेचे बक्षीस म्हणून महापुरुषांची पुस्तके व त्यांना स्टेज करिअर मिळण्यासाठी ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येते. या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती प्रा.मोहन परजणे सर यांनी आपल्या मनोगतमध्ये मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले, गणेश कवडे यांनी बोलतांना सांगितले की, मराठी शाळेबरोबरच उर्दू शाळेच्या मुलींनी पण भाषणामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवल्या बद्दल कौतुक केले. एल आर जाधव सर बोलतांना सांगितले की, एकबाल पेंटर हे पाटोद्याचे भूषण आहे. दरवर्षी जयंती साजरी करतात त्यांचाआदर्श सर्वांनी घ्यावा, भाई विष्णुपंत घोलप यांनी सांगितले की,सावित्रीबाई फुले यांची जयंती आली की, आम्हाला पेंटर साहेबांची आठवण येते. कॉ. महादेव नागरगोजे, जाहेर पाटील, भाई विष्णुपंत घोलप ,एल.आर. जाधव , गणेश कवडे, हरीभगत सर, दिलीपराव गाडे, भगवानराव जावळे ,देमा जावळे , काळूशे सर, सय्यद इलियास ,हादीसर,मुकरम बेग, नजान सर, खेडकर मॅडम,समिना बाजी,जबीन बाजी,तब्सुम बाजी,रफत बाजी,शेख फय्याज, सय्यद ईशरत, जावळे बाई, डिडुळ बाई ,बुद्रुक बाई , साठे, पारवे,सय्यद रेहान, सय्यद इम्रान,तसेच जिल्हा परिषद कन्या शाळेतील शिक्षक शिक्षिका व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण नंतर शेवटी सर्वांचे आभार सज्जाद सय्यद यांनी केले.

## मानकेश्वर जि.प. शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**जिंतूर/दिव्य – न्युज**

दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी जि. प. उच्च प्राथमिक शाळा मानकेश्वर ता. जिंतूर येथे शा.व्य.स. अध्यक्षा श्रद्धाताई काकडे यांच्या प्रमुख उपस्थितित व उच्चश्रेणी मुख्याध्यापक संजाबराव देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली लेक वाचवा लेक शिकवा या अभियानातर्गत क्रांतिज्योती साविञीबाई फुले यांची जयंती बालिका दिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरी झाली. आदर्श समाज निर्मितीसाठी माता साविञीबाई फुले यांच्या विचाराची देशाला नितांत गरज आहे.असे शाळेतिल शिक्षक शिवाजी लाटे सर, सुनिताताई मगर, दिपालीताई ढोले, कैलास पान्डे सर यानी उपस्थित



विद्यार्थ्याना मार्गदर्शनपर भाषणात सांगितले .कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यानी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुञसंचालन समृद्धी काकडे तर आभार प्रदर्शन सुजाता घनसावध या विद्यार्थीनीनी केले.कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळेतिल शिवसाम्भ मुक्कनवार सर यानी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक महेश गाडे यांना जिल्हा शिक्षक पुरस्कार प्रदान



बीड (दिव्य न्युज) : बीड तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, ताडसोन्ना येथील माध्यमिक शिक्षक श्री. गाडे महेश चंद्रकांत यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय काम केल्याबद्दल सन २०२३ चा महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त झाला होता. याच वर्षी त्यांना जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, बीड चा जिल्हा शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२३ हा देखील त्याच वर्षी घोषित झालेला होता परंतु काही कारणास्तव हा पुरस्कार वितरण होऊ शकला नाही. हा जिल्हा पुरस्कार यावर्षी नवीन वर्षी एक जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री मा. अजित (दादा) पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार प्रकाश सोळंके, आमदार विजयसिंह पंडित, आमदार सुरेश धस, आमदार विक्रम काळे, बीडच्या नगराध्यक्षा प्रेमलता पारवे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि प मुख्य कार्यकारी अधिकारी जीतीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जाधव, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रिया राणी पाटील, शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ. किरण कुंवर तसेच शिक्षण क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

**सुरक्षा**

**सामान्यांच्या प्रश्नासाठी शोधकार्य नवं / मुक्त पत्रकारांना कायद्याचं संरक्षण हवं //**






**माजलगाव : आज माजलगाव येथे नगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प) चे गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल खुर्शीद आलम यांचा हार-शाल पुष्प गुच्छ देऊन स्वागत करत पुढील वाटचालीस शुभेच्छा देतांना सहाल चाऊस.**



## सर सय्यद अहेमद खान प्राथमिक व पिपल्स माध्यमिक शाळेत खरी कमाई उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी होत घेतला व्यवहारीक ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव

**बीड । दिव्य वार्ता ।**

शहरातील नामांकित सर सय्यद अहमद खान उर्दू प्राथमिक व पिपल्स माध्यमिक शाळेत 'खरी कमाई' हा अभिनव उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. रविवारी (दि. ०४) सकाळी आयोजित या उपक्रमात शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून विविध खाद्यपदार्थांची विक्री करत प्रत्यक्ष व्यवसायाचा अनुभव घेतला.

पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या उद्योजकीय गुणांना वाव देणे आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकविणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. उपक्रमाचे उद्घाटन आमदार विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष काझी समीर साहेब, संपादक शेख मुजीब, सय्यद मोईनुद्दीन मास्टर साहेब, सचिव शेख निजाम, सचिव मुश्ताक अन्सारी, उद्योजक दिनेश मुंदाडा, संपादक खमरुल इमान, संपादक अबुबकर चाउस, संपादक काझी



समीर, जावेद पाशा सर, नगरसेवक शेख अशफाक इनामदार, नगरसेवक जैतुल्लाह खान साहेब, नगरसेवक महेश धांडे, शेख इकबाल बॉस, नगरसेवक मोमीन झकी, नगरसेवक शेख रोहिल, नगरसेवक शेख बिलाल, नगरसेवक अय्युब साहेब, शेख जमीर सेठ, सय्यद अतिक साहेब, शेख शकील साहेब, खालेद फारुखी साहेब आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. व्यवहार कौशल्य, ग्राहकांशी संवाद, नफा-तोट्याची संकल्पना यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि मेहनतीचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे आत्मनिर्भरतेकडे वाटचाल होते, असे मत व्यक्त केले.

# आ.संदीप क्षीरसागर यांच्या फेसबुक पोस्टची बीड शहरात चर्चा

# अब्ब...! आता काही खरं नाही; संदीपभैय्यांनी टाकेला की गळ्यात घड्याळाचा गमछा





- पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी गळ्यात घड्याळीचा गमछा घालून जोरदार प्रचार
- शहरातील कार्यकर्ते विधानसभा, नगर परिषद निवडणुकीत आप आपसात भिडले
- त्यांनी देखील आपापले वाद मिटवून घ्यावेत

**बीड । दिव्य वार्ता ।**

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या खाजगी फेसबुक पेज वरून एक पोस्ट प्रकाशित झाली त्यात ते पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचार करत असताना दिसतं आहेत या पोस्ट ची चर्चा सध्या सोशल मीडियासह शहरात चर्चेचा विषय झाला आहे.**

या बाबत अधिक वृत असे की नुकत्याच नगर परिषद निवडणुका संपल्या या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते एकमेकांच्या विरोधात लढताना दिसते यात शाब्दिक विरोधासह आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या गेल्या पक्षीय धोरणासाठी कार्यकर्त्यांमध्ये वितुष्ट निर्माण झाले मात्र अचानक आज संदीप क्षीरसागर यांच्या या पोस्ट ने कार्यकर्त्यांच्या भुवया उंचावल्या जणू आश्चर्याचा धक्काच त्यांना बसला ज्या विचाराच्या विरोधात आपण विधानसभा ,नगर परिषद निवडणुकीत लढलो त्याच पक्षाचा गमजा घालून आमदार साहेब प्रचार करत आहेत व त्यात शरद पवार साहेब ,उपमुख्यमंत्री अजित दादा यांच्या एकत्रित येण्यामुळे मतदारांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येतोय असे देखील नमूद करण्यात आले मात्र बीड शहरात परिस्तिथी वेगळीच आहे पक्ष आणि नेत्यांसाठी कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात अनेक शाब्दिक हल्लेचढवले त्यांचे वैर काही संपता संपत नसले तरी त्यात अचानक संदीप भैय्या च्या या फेसबुक पोस्टची चर्चा शहर भरात रंगली आहे ज्यात कार्यकर्त्यांनी ही आप आपले वाद मनभेद मिटवून घ्यावेत असे देखील बोलले जात आहे.



बीड : शहरातील बालेपीर भागात असलेल्या पिपल्स ऊर्दु प्राथमिक शाळेत आज भेट दिली असता शाळेच्या वतीने मुख्याध्यापक अतिक सर यांनी नवनिर्वाचीत नगरसेवक जैतुल्ला खान व संपदाक मोहम्मद अबुबकर यांचे स्वागत केले.

## भारतीय जनता पक्ष हा धर्माच्या नावावर राजकारण करणारा पक्ष आहे

### अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांची भाजपा वर सडकूण टिका





**परभणी । दिव्य वार्ता ।**

परभणी येथे दिनांक ४ जानेवारी रोजी ड प्रकाश आंबेडकर यांची महानगर पालिका निवडणुकीसाठी जाहीर सभा संपन्न झाली यावेळी त्यांनी काँग्रेस व भारतीय जनता पक्ष यांना चांगलेच धारेवर धरले व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी यांनी परभणी जिल्ह्यात काँग्रेसची वाट लावणार आहे असे ते म्हणाले. एकेकाळचा बलाढ्य असलेला काँग्रेस पक्ष आता तसा राहिला नाही, परभणीत तर काँग्रेसची फारच दयनीय अवस्था झाली आहे, त्यांचे २८ पैकी १० उमेदवार मुस्लिम आहेत, आणि उर्वरित उमेदवार हे नातेवाईक आहेत, असा आरोप करत मुस्लिम समाजाने राजकीय नेतृत्व मिळविण्यासाठी आणि संविधान संरक्षणासाठी वंचित बहुजन आघाडीला मतदान करण्याचे आवाहन अँड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. ते परभणी महानगरपालिका निवडणुकीतील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ येथील राहुलनगर परिसरातील पान २ वर

## हजरत मन्सूर शाह वली उर्दू हायस्कूल येथे 'खरी कमाई कॅन्टीन डे'चे भव्य व यशस्वी आयोजन





**बीड । दिव्य वार्ता ।**

हजरत मन्सूर शाह वली उर्दू हायस्कूल, बीड येथे विद्यार्थ्यांमध्ये परिश्रम, स्वावलंबन आणि खरी कमाईचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने खरी कमाई कॅन्टीन डे या उपक्रमाचे अत्यंत यशस्वी व उद्देशपूर्ण आयोजन करण्यात आले. या शैक्षणिक व संस्कारक्षम कार्यक्रमाचे उद्घाटन पीपल्स उर्दू प्रायमरी स्कूल, बीडचे मुख्याध्यापक सय्यद अतिक अहमद साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी विशेष पाहुणे म्हणून मकसूद सर (पीपल्स उर्दू स्कूल) यांनी उपस्थिती लावली, तर सरपरस्त-ए-आला मोहम्मद इब्राहिम अन्वरी यांच्या मार्गदर्शन व आश्रयामुळे कार्यक्रमाची शोभा पान २ वर

## स्व.गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ ऑनलाईन

### महाडीबीटी पोर्टलद्वारे करता येणार अर्ज-जे.डी.शाह



बीड (दिव्य न्युज) : लोकनेते गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ घेण्यासाठी आता महाडीबीटी पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार असून, शेतकऱ्यांना तात्काळ मदत विनाविलंब पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे तरी बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य शेतकरी यांनी शेतात काम करीत असताना होणाऱ्या अपघातग्रस्ताची मदत मिळविण्यासाठी आपल्या गावातच महाडिबीटी या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे पत्रात पुढे म्हटले आहे की शेतात काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह ही योजना महत्त्वाची ठरत असून, यापूर्वी यासाठी ऑफलाइन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जाची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात ओले आहे. तसेच

पान २ वर

## शेख जावेद शेख जाफर यांची 'पोलीस हक्क संघर्ष संघटना' युवा सेल जिल्हाध्यक्ष पदी निवड



बीड (दिव्य न्युज) : सामाजिक क्षेत्रात सातत्याने सक्रिय असणारे तरुण कार्यकर्ते शेख जावेद शेख जाफर यांची 'पोलीस हक्क संघर्ष संघटना, महाराष्ट्र राज्य' च्या युवा सेलच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील युवक वर्गात उत्साहाचे वातावरण आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. झेबा कदीर शेख यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, शेख जावेद यांच्या आतापर्यंतच्या निस्वार्थी सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. या नियुक्ती पत्रात नमूद केल्याप्रमाणे, शेख जावेद यांनी संघटनेचे नियम व अटी पाळून सामाजिक कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल जिल्ह्यातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे. शेख जावेद यांनी आपल्या निवडीबद्दल बोलताना सांगितले की, दिलेली जबाबदारी मी निष्ठेने पार पाडेन आणि सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी संघटनेच्या माध्यमातून सदैव तत्पर राहीन.

## जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींचा विवेक जागा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन

### दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांना तात्काळ न्याय द्यावा -डॉ.गणेश ढवळे



**बीड । दिव्य वार्ता ।**

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवन केंद्रीय जिल्हा परिषद शाळा अंतर्गत दत्तनगर वस्तीशाळेवरील शालेय विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याच्या निषेधार्थ आज सोमवार दि.०५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. दत्तनगर वस्तीशाळेसाठी पान २ वर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०